# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

संलग्नीत महाविद्यालयात अभ्यासक्रम/विषय/विद्याशाखा/तुकडी/संशोधनकेंद्रा करिता

## जाहीर प्रगटन

(शासन पत्र क्र. बृआमा–२०१८/प्र.क्र. २८१/विशि–३, उ व त शि विभाग, दि. ११.व १७.०९.२०१८, बृआमा २०१९/प्र.क्र.१८८/विशि–३ दि.२५/०७/२०१९ अन्वये व वृत्तपत्रातील संक्षिप्त जाहिर प्रगटनाचा सविस्तर तपशील)

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड हे बृहत आराखडा/ वार्षिक योजने अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२०–२१ करिता विद्यापीठ कार्यक्षेत्रात (नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर जिल्हा) संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/अभ्यासक्रम/विद्याशाखा/तुकडी/ संशोधन केंद्र, पदविका, इत्यादीसाठी संलग्नित महाविद्यालयाच्या संस्थेकडून प्रस्ताव मागवित आहेत. सादर करावयाचे विहीत नमुन्यातील प्रस्ताव / आवेदनपत्र, विद्यापीठाचा बृहत आराखडा व वार्षिक योजना ( Perspective / Yearly Plan २०२०–२१) परिशिष्टांसह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा २०१६ अन्वये संस्था/महाविद्यालयांनी आवेदनपत्र/प्रस्ताव, सादर करतांना शासन निर्णयात नमुद परिशिष्ट 'अ' सह विहीत केल्या प्रमाणे, विहीत शुल्कासह आवेदनपत्र / प्रस्तावा सोबत (परिशिष्ट 'ब' नुसार) आवश्यक सर्व कागदपत्रे क्रमाने जोडुन विद्यापीठात सादर करण्याची अंतीम तारीख सोमवार, दि. ३०/०९/२०१९ ही आहे. सर्व संबंधितास आवेदनपत्र / प्रस्ताव शनिवार (प्रथम/तिसरा), रविवार व इतर सार्वजनिक सुट्टया वगळून कार्यालयीन कामकाजा दिवशी सशुल्क दाखल करता येतील. अंतीम तारखेनंतर कोणतेही प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

महाराष्ट्र शासनाचे दि. १३/०९/२०१७ व वेळोवेळीचे शासन निर्णय व निर्देश, विद्यापीठ अनुदान आयोग ( विद्यापीठाकडून महाविद्यालयांना संलग्निकरण ) विनियम २००९ नुसार नमूद केलेल्या विनियमातील तरतूदी व बृहत आराखडयामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे संस्थेने संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/अभ्यासक्रम/विद्याशाखा/तुकडी/संशोधन केंद्र,पदविका इत्यादीसाठीची मागणी करण्यापूर्वी विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयात NAAC / NBA/ QCI, नियमीत प्राचार्यांची नियुक्ती, संलग्नित अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ मान्यता प्राप्त शिक्षक संख्या, आवश्यक जमीन, विहीत क्षेत्रफळ असलेल्या प्रशासकीय, शैक्षणिक आणि इतर इमारती, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची उपलब्धता, वीज, पाणी, स्वच्छतागृह इत्यादींची व्यवस्था, विनियमातील तरतूदीनुसार ग्रंथालय, प्रयोगशाळा, सभागृह, सुयोग्य फर्निचर, तासिकांसाठी खोल्यांची व्यवस्था, आर्थीक तरतुद इत्यादी सर्व बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्यामुळे संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/अभ्यासक्रम/विद्याशाखा/तुकडी/संशोधन केंद्र, पदविका इत्यादीसाठी प्रस्ताव /आवेदनपत्र सादर करण्यापूर्वी संबंधीतानी या बाबत खातरजमा करून घ्यावी.

संलग्नित महाविद्यालयाच्या नवीन विषय/अभ्यासक्रम/विद्याशाखा/तुकडी/संशोधन केंद्र, पदविका ईत्यादीच्या अनुषंगाने आवश्यक बाबींचे छायाचित्रे व व्हिडीओ शुटींग करून त्याची डी.व्ही.डी प्रस्तावाच्या प्रत्येक प्रतीसोबत जोडण्यात यावी. संस्थेच्या प्राप्त प्रस्तावातील परिशिष्ट 'ब' नुसार छाननी समितीने पात्र केलेल्या प्रस्तावाकरिता पाहणी समिती पाठविण्यात येईल. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ नुसार संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/अभ्यासक्रम/विद्याशाखा/ तुकडी/संशोधन केंद्र, पदविका इत्यादीसाठी प्रस्तावाच्या अर्जाचा नमुना विद्यापीठ संकेतस्थळावरून प्राप्त करून ०५ (पाच) प्रतिमध्ये आवश्यक शुल्कासह दाखल करावा.

विद्यापीठ संकेतस्थळ : www.srtmun.ac.in/ en/affiliation-section

स्वा/–

कुलसचिव

संदर्भ शैक्षणिक/संलग्न–०३/२०१९–२०/१२५८
दिनांक : ०४/०९/२०१९
स्थळ : नांदेड